# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ११/११/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | विषय क्र. १) मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०३/११/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :- ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०३/११/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| २ | विषय क्र. २) १४ नोव्हेंबर बालदिनाचे औचित्य साधून महानगरपालिका हद्दित विविध ठिकाणी बालक मेळावे आयोजित करणेबाबत. | **ठराव :-** बालदिनाचे औचित्य साधून १४ वर्षाखालील मुलांकरीता महानगरपालिका हद्दितील विविध ठिकाणी बालक मेळावे आयोजित करण्यांत यावे. सदर मेळाव्याचे आयोजन प्रभाग समिती निहाय करण्यांत यावे, प्रत्येक मेळाव्याच्या ठिकाणी आवश्यक लागणारे सर्व साहित्य मंडप, स्टेज, साऊंड सिस्टम, टेबल, खुर्ची, जनरेटर, फोटोग्राफर, व्हिडीओशुटींग, मुलांना खाऊ, विविध प्रकारची खेळणी, चहा, नास्ता, पिण्याचे पाणी, ट्रॉफी, सन्मान चिन्ह, बॅनर इ. ई-निविदा प्रक्रिया करुन इच्छुक ठेकेदार खाजगी संस्था यांचेमार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. याकरीता एका कार्यक्रमाकरीता अंदाजे १,००,०००/- अपेक्षित खर्च याप्रमाणे एकूण १० कार्यक्रमाकरीता येणाऱ्या अंदाजे १०,००,०००/- रु. खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. याकामी येणाऱ्या अंदाजे १०,००,०००/- रु. खर्चास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजित नाईक सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील नोंदणीकृत जेष्ठ नागरीक संस्थांना वार्षिक अनुदान मंजुर करणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार प्रस्तावातील नमुद एकूण १२ जेष्ठ नागरीक संस्थांना सन २०१६-१७ या वर्षाकरीता वार्षिक अनुदान प्रत्येकी रु. १ लक्ष म्हणजे एकूण रक्कम रु. १२,००,०००/- (अक्षरी बारा लक्ष रु. मात्र) देण्यास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यका देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजित नाईक सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम आयोजित करणेबाबत | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. अधिकारी/कर्मचाऱ्यांचे तणाव विरहीत कार्यपध्दतीसाठी सदरचा कार्यक्रम अतिशय स्त्युत्य असल्याचा व सदर कार्यक्रमासाठी रु. ९०,०००/- पर्यंतच खर्च येणार असल्याची प्रशासनाकडून स्थायी समितीस माहिती प्राप्त झाली असून सदर खुलाशाच्या अनुषंगाने आजची स्थायी समितीची |

| | | |
|---|---|---|
| | | सभा सदर प्रस्तावास व कार्यक्रमासाठी येणाऱ्या खर्चास कार्योत्तर मंजूरी प्रदान करीत आहे. तसेच उक्त कामी कलावतांचे अदा केलेल्या मानधनाच्या रक्कमेसह इतर अनुषंगिक बाबींवर झालेल्या खर्चास कार्योत्तर, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील  सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ५ | प्रभाग समिती एफ, धानिव / पेल्हार क्षेत्रातील धानिव गाव येथील धानिव गाव विभागीय कार्यालयामधील प्राथमिक आरोग्य केंद्राची सुधारणा करणे कामी कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सांगोपन चर्चा होऊन उपरोक्त निविदांची तुलना करता मे.एस.एस.एंटरप्रायजेस यांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील  सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ६ | प्रभाग समिती एफ, धानिव / पेल्हार क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७३ मध्ये शिवाजीनगर दलितवस्ती ते खैरपाडा मेन रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे.नेवाळकर एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ३.००% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच  महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील  सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ७ | दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत प्रभाग समिती ई (आय) कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील नर्सरी बागमध्ये नागेश्वर मंदिर जवळ संरक्षक भिंत व पेव्हर ब्लॉक बसविणे (सन २०१४-१५) कामी कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे.आकाश कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ४.४१% कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे  महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा. तर्फे सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील  सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |

| | | |
|---|---|---|
| ८ | दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत प्रभाग समिती ई (आय) कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी बौद्ध पाडा लगतच्या रस्त्यास पेव्हर ब्लॉक पुरविणे व बसविणे (सन २०१४-१५) कामी कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे.आकाश कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ४.४१% कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या अंतिम खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ९ | वसई-विरार शहर महानगरपालिक प्रभाग समिती डी मधील फुटपाथ / डिव्हायडर दुरुस्ती व रंगकाम करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. ओमकार एंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त झालेली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. ओमकार एंटरप्रायजेस यांच्याशी कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेत येत असून सदर कामी अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| १० | सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील उद्याने, सर्कल, डिव्हाईडर इत्यादी कामाकरीता लाल माती, मुरुम, बारीक वाळू व शेणखत खरेदीकामी मागविणेत आलेल्या मंजुर निविदाधारकासोबत सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी संविदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त प्रस्तावावर सभेमध्ये साधक बाधक चर्चा करणेत आली. प्राप्त तीन निविदाधारकांपैकी मे. ॲस्थेटिक यांचे प्राप्त निविदा दर इतर निविदाधारकांपेक्षा व प्राप्त बाजारभावांबाबतचे पत्रांचे अवलोकन करता बाजारभावापेक्षा कमी व किफायती व योग्य असल्याने त्यांची निविदा मंजूर करुन त्यांच्याबरोबर संविदा करणेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. **अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ११ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये /दवाखाने/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये/दवाखाने/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वैद्यकिय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे वार्षिक पध्दतीने देखभाल व दुरुस्ती करणेकामी मागवण्यांत आलेल्या ई-निविदेमधील वरील सोबतच्या सुचितील पृष्ठ क्र. १६ ते १८ वरील घटकांचे तीन दर प्राप्त आहेत. ते दर योग्य व वाजवी आहेत. सदरची ई-निविदा मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी मंजूरीस शिफारस केली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | इलेक्ट्रीक उपकरणे वार्षिक पद्धतीने देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्राप्त झालेल्या कमी दराच्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत. | तरी सदर कमी दराच्या ई-निविदाकाराबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजीत नाईक सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| १२ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, दवाखाने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व माताबाल संगोपन केंद्रास ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह सेवा व आवश्यक साहित्य मागवण्यात आलेल्या कमी दराच्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, दवाखाने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व माताबाल संगोपन केंद्रास ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह सेवा व आवश्यक साहित्य मागवण्यात ई-निविदेच्या मंजूरीबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आली की, प्राप्त ई-निविदेमधील १ ते २१ घटकांचे तीन दर प्राप्च आहेत. ते दर योग्य व वाजवी आहेत. सदरची ई-निविदा मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी मंजूरीस शिफारस केली आहे. तरी सदर कमी दराच्या ई-निविदाकाराबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| १३ | वसई-विरार शहर महानगरपालिका मालकीच्या स्मशान भुमीसाठी लागणाऱ्या जळावू लाकडे खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त अहवालावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. वसई-विरार शहर महानगरपालिकेतील स्मशानभुमीसाठी प्रेत दहनाकरीता ६ महिन्यासाठी आवश्यक असलेली ३८२१.७६३ घनमीटर जळाऊ लाकडे फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड शिरसाड यांचेकडून खरेदी करण्यात यावी. सदर जळाऊ लाकडाच्या खरेदेची रक्कम रु. ४७,९१,१७८/- व परवाना (पास) फि रक्कम रु. ३४,८००/- अशी एकूण रक्कम रु. ४८,२५,९७८/- फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड शिरसाड यांना आगाऊ स्वरूपात अदा करणेंत यावी. सदरची जळाऊ लाकडे स्मशानभुमिमध्ये पोहच करणेकामी वाहन विभागातील मंजूर ठेकेदाराला वाहन पुरविणेस आदेश देणेत यावा. सदर ठेकेदाराला जळाऊ लाकडे वाहतुकीचे होणारे देयक रक्कम रु. ६,९६,०००/- अदा करण्यांत यावे. तसेच स्मशानभुमिमधील मोठ्या आकाराची/वजनाची लाकडे सॉ मिल (वखारी) मधून कापून घेणे याकामी येणाऱ्या सर्व खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच पुढील कालावधीकरीता स्मशानभुमिसाठी जळाऊ लाकडे खरेदी करणेकामी जाहिर ई-निविदा प्रक्रिया करणेंस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| १४ | श्री. हर्षल रघुनाथ पाटील ह्यांनी ठोक वेतनात वाढ करुन ते कमीत कमी रु. ३००००/- | **ठराव :-**महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या मंजूर पदावर नियमित कर्मचाऱ्याची/-नेमणूक होईपर्यंत करारपध्दतीने सहा महिन्यासाठी रु. २५,०००/- इतक्या ठोक वेतनावर नेमणूक |

| | | |
|---|---|---|
| | इतके करणेबाबत. | करण्यांत आलेल्या श्री. हर्षल पाटील यांचे ठोक वेतनात रू. ५,०००/- इतकी वाढ करून ते रू. ३०,०००/- इतके करण्यास तसेच सदरचा खर्च सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स) ह्या लेखाशिर्षाखाली भागविण्यास ही स्थायी सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील    सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |
| १५ | वसई-विरार शहर महानगरपालिका व साहित्य जल्लोष प्रतिष्ठान (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य जल्लोष कार्यक्रम आयोजित करणेस व त्याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत | **ठराव :-** सदर विषयाबाबत आजच्या मा.स्थायी समिती सभेत सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार साहित्य जल्लोष हा कार्यक्रम वसई विरार शह महानगरपालिका (ग्रंथालय विभाग) व साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेने संयुक्त विद्यमाने करावयाचा असून कार्यक्रमासाठी होणाऱ्या अंदाजित रू. १०,५७,०००/-इतक्या खर्चापैकी रू. ८ लक्ष इतका खर्च महानगरपालिका निधीतुन करण्यांत यावा आणि उर्वरीत २,५७,०००/- इतका खर्च साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेने करावा अशा निर्णय घेण्यांत येत आहे. तसेच महानगरपालिका निधीतुन करण्यांत येणारा खर्च रू. आढ लक्ष इतकी रक्कम साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेच्या खात्यामध्ये थेट (R.T.G.S.) द्वारे वर्ग करण्यास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. सदर कार्यक्रमासाठी झालेल्या एकूण खर्चाचे विवरण पत्र महानगरपालिकेत साहित्य जल्लोष प्रतिष्ठान संस्थेकडून घेण्यांत यावे यास देखील ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| १६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ९ व कलम ९४ मधील तरतुदीनुसार सन २०१५-१६ ची वार्षिक लेखा विवरणपत्रे मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणे. | **ठराव :-** सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाच्या जमा-खर्चास वार्षिक लेखे व सहपत्रे मान्य करून ठरावाचे प्रतीसह प्रसिध्द करणेंस व प्रस्तावित प्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध करणेस प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अजित नाईक    सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |